अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१४-१५ मधील कला प्रमाणपत्र प्रमाणित करण्याबाबत व आरक्षणाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्र. प्रवेश -२०१४/प्र.क्र.८१/एसडी-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ मे, २०१४.

प्रस्तावना :-

कलेच्या क्षेत्रातील इयत्ता अकरावीतील प्रवेश मिळण्यासाठी राखीव ठेवलेल्या २% जागांकरिता प्रमाणपत्र प्रमाणित करुन देण्याबाबत दि. ६/५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक ८/५/२०१४ रोजी निर्गमित केलेले आहे. कला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र प्रमाणित करण्याबाबत तसेच आरक्षणबाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-** शासनमान्य संस्थेकडून संगीत, नृत्य व नाट्य क्षेत्रात प्राविण्य प्रमाणपत्र मिळविलेले विद्यार्थी /सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित राज्य नाट्य/ बालनाट्य/ व्यावसायिक नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक मिळविलेले विद्यार्थी / राज्य/केंद्र अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर चित्रपट पुरस्कार मिळविलेले विद्यार्थी यांच्या प्रमाणित याद्यांची सॉफ्ट कॉपी सांस्कृतिक कार्य विभागाने दिनांक २०/५/२०१४ रोजी या विभागास उपलब्ध करुन दिलेली असून सदर सॉफ्ट कॉपी सर्व संबंधित शिक्षण उपसंचालक यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. सदर यादीप्रमाणे संबंधित शिक्षण उपसंचालक यांनी कलेच्या क्षेत्रातील इयत्ता अकरावीतील प्रवेश मिळण्यासाठी राखीव ठेवलेल्या २% जागांकरिता प्रमाणपत्र प्रमाणित करुन घेण्याची आवश्यकता नसल्याबाबतची ऑनलाईन सूचना अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावरती देण्याची कार्यवाही करावी. तसेच प्रवेश प्रक्रिया करतांना सदर प्रमाणित याद्यांप्रमाणे विद्यार्थ्याच्या नावाची खात्री करुन घ्यावी.

अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करताना सामाजिक व विशेष आरक्षणाचा (आजी/माजी सैनिकांच्या पत्नी/पाल्य , स्वातंत्र्य सैनिक/पाल्य, बदलीने आलेल्या राज्यशासन, केंद्रशासन/खाजगी क्षेत्रातील कर्मचारी यांचे पाल्य यांना ५%, कला व सांस्कृतिक २%, क्रिडा ३%, शारिरिक दृष्टया अपंग ३% ) विचार करतांना शासनाच्या प्रचलित आरक्षणाच्या धोरणानुसार सामाजिक आरक्षणाच्या संख्येतून समांतर आरक्षण देऊन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बी. आर. माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
उपसचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक).
मा. मुख्यमंत्र्याचे उपसचिव, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
सचिव (शा.शि. व क्री.) यांचे स्वीय सहायक.
सह सचिव (विद्यार्थी), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, एसडी-२.